| 4200470000 | **M/E WARD - HEALTH** | **3,11,04,000.00** | **3,11,04,000.00** |
| 140110700 | Renewal Charges | -1,00,000.00 | -1,00,000.00 |
| 140200105 | Penalties recovered frm Contractors | -1,00,000.00 | -1,00,000.00 |
| 140804100 | New building insecticide treatment | -1,50,00,000.00 | -1,50,00,000.00 |
| 180400000 | Recovery frm Emplys. | -1,00,000.00 | -1,00,000.00 |
| 180400200 | Fine | -15,000.00 | -15,000.00 |
| 180400301 | Rent Recovery -Non Taxable | -7,000.00 | -7,000.00 |
| 210100101 | Basic Pay | 60,69,000.00 | 60,69,000.00 |
| 210100102 | Incentive Bonus | 2,86,000.00 | 2,86,000.00 |
| 210100201 | Basic Pay | 1,05,30,000.00 | 1,05,30,000.00 |
| 210100202 | Incentive Bonus | 10,14,000.00 | 10,14,000.00 |
| 210200101 | Dearness Allowance | 34,00,000.00 | 34,00,000.00 |
| 210200102 | House Rent Allowance | 18,21,000.00 | 18,21,000.00 |
| 210200103 | Conveyance Allowance | 55,000.00 | 55,000.00 |
| 210200105 | Leave Travel Assistance | 41,000.00 | 41,000.00 |
| 210200113 | Trv All for Sup&Sub | 3,89,000.00 | 3,89,000.00 |
| 210200118 | Family Planning Allowance-sup | 12,000.00 | 12,000.00 |
| 210200119 | Children Education Allowance-sup | 48,000.00 | 48,000.00 |
| 210200201 | Dearness Allowance | 58,97,000.00 | 58,97,000.00 |
| 210200202 | House Rent Allowance | 31,60,000.00 | 31,60,000.00 |
| 210200205 | Leave Travel Assistance | 67,000.00 | 67,000.00 |
| 210200213 | Transport Allowances For Labour | 12,42,000.00 | 12,42,000.00 |
| 210200218 | Family Planning Allowance-Labour | 30,000.00 | 30,000.00 |
| 210200219 | Children Education Allowance-lab | 1,97,000.00 | 1,97,000.00 |
| 210200299 | Other Allowances | 2,33,000.00 | 2,33,000.00 |
| 210209913 | Uniforms | 60,000.00 | 60,000.00 |
| 210501224 | Reim Prem of HealthInsur Policy BMC Emp | 7,80,000.00 | 7,80,000.00 |
| 220119900 | Other Office Contingent Expenses | 5,000.00 | 5,000.00 |
| 220120102 | Mobile Phone Expenses | 6,000.00 | 6,000.00 |
| 220120500 | Postage Expenses | 2,000.00 | 2,000.00 |
| 220210400 | Stationery | 10,000.00 | 10,000.00 |
| 220210600 | Photocopying expenses | 10,000.00 | 10,000.00 |
| 220300200 | Conveyance | 4,000.00 | 4,000.00 |
| 220800400 | Outside Services Employment Expenses | 1,09,88,000.00 | 1,09,88,000.00 |
| 230350001 | Accessories | 10,000.00 | 10,000.00 |
| 230350006 | Clothing & Linen | 30,000.00 | 30,000.00 |
| 230350010 | Material | 5,000.00 | 5,000.00 |
| 230350012 | Other store | 10,000.00 | 10,000.00 |
| 230350014 | Spares & Tools | 15,000.00 | 15,000.00 |

01/04/2024

INSECTICIDE OFFICER

## पुस्तिका – 13

**याव्दारे देण्यात येणारी सवलत, परवानगी, अधिकृतता याबाबत सविस्तर अहवाल**

किटकनाशक अधिकारी यांचे कार्यालयातून देण्यात येणारी विहीर, कुपनलिका, कुलींग टॉवर, तरण तलाव, टाक्या इत्यादींना परवानगी किंवा ना हरकत प्रमाणपत्रासाठी आवश्यक दस्तऐवज.

1. परवानगी किंवा ना हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज, विहीर किंवा कुपनलिकेसाठी सादर केलेल्या अर्जासह पाण्याचा वापर कशासाठी केला जाणार आहे, पिण्यासाठी वगळून, हयाचा उल्लेख करावा.
2. विहीर, कुपनलिका इ. चा स्थळदर्शक नकाशा.
3. मालकी हक्काचे पुरावा.

पाण्याचे कृत्रिम कारंजे / धबधबा इत्यादी (नविन/ अस्तित्वात असलेला / परवानगी दिलेला) यांच्या परवानगी बद्दल माहिती.

1. सर्वसाधारण नियम

कृत्रिम कारंजे / धबधबे यांचे करिता परवानगी मु.म.न.पा. अधिनियम 381/अ (1) अन्वये देण्यात येतील व त्याबाबतचे अर्ज खालील पत्यावर उपलब्ध होतील.

किटकनाशक अधिकारी,

प्राथमिक शिक्षण विभाग कार्यालय इमारत, २ रा मजला,

गिल्डर टँक मैदान, डॉ. दादासाहेब भडकमकर मार्ग,

ग्रँट रोड, (पूर्व), मुंबई - ४०० ००७.

2) नविन अस्तित्वात असलेली पाण्याची कृत्रिम कारंजी / धबधबे यांची परवानगी कार्यप्रणाली

अ) अर्ज :

अर्जाचा नमुना विभागवार किटक नियंत्रण अधिकारी यांच्या कार्यालयात रोख रु 50/- रु पन्नास (अधिक व्हॅट) भरून उपलब्ध होतील.

ब) पडताळणी शुल्क :

पडताळणी शुल्क रू. 200/- दस्तऐवजा सोबत देणे आवश्यक आहे.

क) दस्तऐवज:

1. मालमत्ता कराचे अलीकडचे देयक व पावती किंवा मालमत्ता कार्डाचे अगदी अलीकडची प्रत सूचीपत्र ॥ च्या प्रती (सर्व साक्षांकित केलेल्या)
2. मनपाच्या इमारत प्रस्ताव खात्यातून मंजूर झाल्येल्या नकाशाच्या व साक्षांकित केलेल्या प्रती.
3. परवानाधारक वास्तुविशारद / सर्व्हेअर.

अ) उभा छेद.
ब) आडवा छेद.
क) दर्शनी भाग.
ड) टाकीचा आकार आणि क्षमता लीटर मध्ये.
इ) मॅनहोल टाकीचा आकार आणि बॅलंसींग.
ई) संपपीट मध्ये जाणारे पाणी वॉटर सिल मधून जावे व ते एक /किंवा अधिक न्हाणीट्रॅप मधून असावे.
फ) पाण्याचा निचरा मनपा गटार व्यवस्था किंवा शोष टाकीला जोडलेला असावा.

2) परवानगी कार्यप्रणाली:

अ) कृत्रिम कारंजे / धबधबे इत्यादी बांधण्याकरीता प्रथमत: कागदपत्र पडताळून अंतरीम परवानगी देण्यात येईल.

ब) कृत्रिम कारंजे / धबधबे इत्यादीच्या बाबत अटींचा मसूदा जे परिशिष्ट 'क' या पुस्तिके मध्ये आहेत व सदर अटीं प्रत्यक्ष पूर्ण केल्यानंतर अंतीम परवानगी देण्यात येईल.

1) रू.५००/- च्या मुद्रांक कागदावर कृत्रिम कारंजे / धबधबे इत्यादींची परवानगीसाठी लागू असणा-या अटींचा वचननामा.

2) पुस्तकात दिलेल्या परिशिष्ट 'ब' प्रमाणे (इन्डेम्निटी बाँड)

3) रू. २0,000/- (रू. वीस हजार फक्त) अनामत रक्कम. रोख किंवा / पे ऑर्डर / डी.डी बृ.मु.म.न.पा. यांचे नावे.

4) रू. ७८००/- (रू. सात हजार आठशे रुपये फक्त) शुल्क. रोख किंवा / पे ऑर्डर / डी.डी बृ.मु.म.न.पा. यांचे नावे.

4) नुतनीकरण कार्यप्रणाली :

अ) नूतनीकरण कालावधी

परवानगी समाप्त होण्याच्या आगोदर कुठल्याही वेळी.

ब) नुतनीकरण शुल्क

नुतनीकरण शुल्क रू. ७८ 00/- (रू. सात हजार आठशे रुपये) वार्षिक.

क) विलंब शुल्क

कृत्रिम कारंजे / धबधबे इत्यादीच्या नूतनीकरणास विलंब झाल्यास खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल

| अ.क्र | नूतनीकरण विलंब कालावधीचा | दंडाची % टक्केवारी | दंड शुल्क रु. |
|---|---|---|---|
| 1. | पहिली तिमाही | २५% | १९५०=०० |
| 2. | दुसरी तिमाही | ५०% | ३९००=०० |
| 3. | तिसरी तिमाही | ७५% | ५८५०=०० |
| 4. | चौथी तिमाही | १००% | ७८००=०० |

सदर विलंब शुल्क परवानगी शुल्काच्या अतिरिक्त भरणे आवश्यक आहे.

ड) नूतणीकरणाचे नियम :

कृत्रिम कारंजे / धबधबे इत्यादीच्या परवानगीचे नूतनीकरण करण्यात येईल. परंतू जे कारंजे / धबधबे इत्यादी सद्यस्थितीत वाईट अवस्थेत असतील किंवा मनपा आयुक्तांच्या इच्छेनुसार बदललेल्या धोरणासह नसल्यास नुतनीकरण नाकारण्यात येतील.

इ) नुतनीकरण न झालेले कारंजे/धबधबे इत्यादी बद्दल धोरण

अ) एका वर्षावर नुतनीकरण न झालेल्या कारंजे / धबधबा इत्यादीच्या परवानगी रद्द करण्यात येईल.

ब) एका वर्षात नुतनीकरण न झालेल्या कारंजे / धबधबा इत्यादीच्या अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

क) मनपा अधनियम 381/अ अन्वये सदर नुतनीकरण न झालेल्या कारंजे / धबधबा यांवर कारवाई करण्यात येईल.

ड) आवश्यकता भासल्यास सदर कृत्रिम कारंजा / धबधबा मालकाच्या जबाबदारी खर्चावर जप्त करण्यात / तोडण्यात येईल.

5) परवानगी रद्द केलेल्या कृत्रिम कारंजा / धबधबा इत्यादीच्या पूर्नपरवानगी बाबत कार्यप्रणाली:

परवानगी रद्द केलेल्या कृत्रिम कारंजा / धबधबा इत्यादीच्या पूर्नपरवानगी साठी अनु क्र. – V मध्ये सांगितल्याप्रमाणे नवीन परवानगीसाठी अर्ज करावा.

71

6) परवानगी हस्तांतरणाकरिता प्रक्रीया:

परवानगी हस्तांतरणसाठी खालील बाबींचा विचार करण्यात येईल.

1) मालक / मालकांचा मुत्यु किंवा निवृत्ती पश्चात त्यांचे कायदेशीर वारस.

2) परवानगीधारक याच्या नावात वाढ / बदल किंवा नाव वगळणे / कमी करणे.

**<u>परिशिष्ट – 'क'</u>**

**<u>कृत्रिम कारंजे / धबधबा इत्यादीच्या नियामक बंधनाच्या हमीपत्राच्या करारनाम्याचा मसुदा</u>**

(रू.500/- च्या मुद्रांक कागदावर सादर करणे आवश्यक आहे.) मनपा अधिनियम 479 (1), अनूसार खालील बंधने तयार केलेली आहेत. कृत्रिम कारंजा/धबधबा इत्यादीची परवानगी मनपा अधिनियम 381A अन्वये देण्यात येत आहे.

1) मी/आम्ही, मला/आम्हाला जाणीव आहे की, कुठलेही बांधकाम किंवा निर्माणाची स्थापना जसे कृत्रिम शोभिवंत टाकी/कारंजा/बगीचा टाकी/ कुंड टाकी, कालवा इ. ज्या ठिकाणी पाणी खेळविण्यात येत आहे त्याची परवानगी वरील मजल्यावर किंवा गच्चीवर बांधण्यास / ठेवण्यास देता येणार नाही.

2) मी/किंवा आम्ही हे पाहू की, सदर शोभिवंत टाकी, कारंजा, कृत्रिम तलाव जमिनीच्या भुपृष्ठावर असेल आणि पाणी शेवटच्या थेंबापर्यंत बाहेर जाण्यास सुविधाकारक असेल, पाण्याचा निचरा योग्य जोडणीद्वारे महापालिका गटारामध्ये असेल.

3) मी/किंवा आम्ही हे पाहू की, पाण्याचे अभिसरण धबधब्यामधून, कुंड, टाकी किंवा खोलगट आकाराच्या/किंवा पृष्ठभागावर होईल त्याकरिता आवश्यक तो उतार ठेवण्यात येईल, कि ज्यामुळे कारंजा इ. बंद असताना पाणी जमा होणार नाही.

4) मी/किंवा आम्ही हे पाहू की, सर्व उभे व आडवे पृष्ठभाग ज्या ठिकाणी पाणी वाहत आहे किंवा पडत आहे ते पूर्णपणे सपाट आणि गुळगुळीत असतील, की ज्यावर कोणताही कप्पा तयार होणार नाही. जिच्यावर पाणी साचणार नाही व निचरा होण्यास अडथळा निर्माण करू शकेल.

5) मी/किंवा आम्ही हे पाहू की, कृत्रिम कारंजा/धबधबा इ. मध्ये अशी व्यवस्था असेल की जर सदर कारंजा इ. बंद झाल्यास संपूर्ण पाणी एका डास प्रतिबंधक टाकीत पडेल. सदर डास प्रतिबंधक टाकीस मनपा मान्यताप्राप्त लोखंडी झाकण जे गोल आकाराचे असेल, व सदर टाकीस 1.5 एम.एम. पेक्षा जास्त छिद्र असणार नाही. मी/किंवा आम्ही हे पाहू की, ज्या क्षणी सदर कृत्रिम कारंजे/धबधबा इ. काम करावयाचे बंद होईल त्याक्षणी संपूर्ण पाणी मनपा नाल्यात निघून जाईल.

6) मी/किंवा आम्ही हे पाहू की, जेव्हा कारंजा / धबधबा इ. चालू असेल तेव्हा अविरत शिडकावा होत राहील.

7) मी/किंवा आम्ही हे पाहू की, मला/आम्हांस सूचना मिळाल्यावर सदर कारंजा/धबधबा इ. आठवडयातून एकदा तपासणी करीता संपूर्ण बंद ठेवून कोरडा ठेवू.

8) मी/किंवा आम्ही असे नमूद करतो की, कारंजा, इत्यादीत कुठलीही पाणवनस्पती लावण्यात येणार नाहीत की त्यामुळे आठवडयाचा कोरडा दिवस पाळण्यात अडथळा येईल.

9) मला/आम्हांस हया गोष्टीची जाणीव आहे की, फक्त जे/ज्या व्यक्ती सदर जागेचे कायदेशीर वहिवाटदार आहेत ते /त्या व्यक्ती सदर परवानगीकरीता अर्ज करू शकतील आणि इतर कोणत्याही व्यक्ती उदा. बांधकाम करणारा/विकासक, वास्तू विशारद, ठेकेदार इत्यादी यांचे अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जासोबत सदर कारंजा/धबधबा इ. चे योग्य नकाशा, आराखडा नियोजीत बांधकाम व पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था याबाबत योग्य तो तपशिल उपलब्ध नसल्यास अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

10) मला/आम्हांस जाणीव आहे की, मनपाने निर्धारीत केलेले परवानगी शुल्क व नुतनीकरण शुल्क परवानगी मिळण्याच्या तारखेस, जे मनपाने निर्धारीत केले असेल, ते भरावे लागेल व सदर शुल्क जर परवानगी मिळाल्यावर पुन्हा निर्धारीत करण्यात आले तर मला / आम्हाला शुल्काचा जो काही फरक असेल तो न भरल्यास परवानगी रद्द करण्यात येईल व पुढील कारवाई करण्यांत येईल.

11) मला/आम्हाला हया गोष्टीची जाणीव आहे की, सदर परवानगी ही दिल्या तारखेपासून मार्च महिन्याच्या अखेरपर्यंतच वैध आहे व त्यांचे नुतनीकरण पुढील प्रत्येक आर्थिक वर्षासाठी केले जाईल.

12) मला/आम्हांला जाणीव आहे की, सदर परवानगीचे शुल्क हे धनादेशाव्दारे भरल्यास व धनादेश न वटल्यास संबंधित परवानगी रद्द करण्यात येईल व पुढील कारवाई करण्यात येईल.

13) मला/आम्हाला जाणीव आहे की, परवानगी शुल्कचा परतावा मिळणार नाही.

14) मला/आम्हाला जाणीव आहे की, परवानगीधारक, त्यांच्या परवानगीचे नुतनीकरण प्रत्येक वर्षी मार्च महिन्यात योग्य ते शुल्क भरून करतील. पुढील नुतनीकरण करण्याकरीता मनपातर्फे कोणतीही सुचना देण्यात येणार नाही. जर काही करणास्तव परवानाधारक नुतनीकरण शुल्क विहित मुदतीत भरू शकला नाही, तर सदर परवानगी मनपाच्या सक्षम अधिका-यांच्या मंजूरीने विलंब शुल्क अधिक परवानगी शुल्क भरून नुतनीकरण करण्यात येईल. जर नुतनीकरण शुल्क न भरल्यास सदर परवानगी ही आपोआप रद्द होईल व परवानाधारकावर योग्य ती न्यायालयीन कारवाई करण्यात येईल व सदर परवानगीच्या नुतनीकरण दावे विचारात घेतले जाणार नाहीत.

15) मला/आम्हाला जाणीव आहे की, परवानगीधारकास मनपा अधिनियमाच्या इतर तरतुदी पासून कोणत्याही प्रकारच्या बंधनापासून मुक्त करण्यात येणार नाही व सदर परवानगी ही कोणत्याही वेळी, गरज पडल्यास निलंबीत वा रद्द करण्यात येईल.

16) मला/आम्हाला जाणीव आहे की, सदर परवानगीधारक कोणत्याही प्रकारे या परवानगीत उल्लेखिलेल्या अटीचे उल्लंघन वा भंग करणार नाही. अशा प्रकारणांमध्ये परवानगीधारक कायदेशीर कारवाईस पात्र वा परवानगी रद्द होण्यास पात्र असेल.

17) मला/आम्हाला जाणीव आहे की, परवानगी धारकाने सदर परवानगी योग्य त्या प्राधिकृत अधिका-याने अथवा पालिकेने तपासणीसाठी जेव्हा मागतिल तेव्हा त्यांस सादर करावा लागेल.

18) मला/आम्हाला जाणीव आहे की, सदर परवानगीधारक यांनी परवानगीत कोणत्याही प्रकारचा बदल करण्याचे ठरल्यास संबंधित विभागातील किटकनियंत्रण अधिकारी यांना बदलाच्या तारखेच्या कमीत कमी एक महिना अथवा परवानगी रद्द होण्याच्या अगोदर लेखी कळवतील

19) मला/आम्हाला जाणीव आहे की, सदर परवानगीची जागा, परवानाधारक किवा त्यांचे प्रतिनिधी मनपा अधिका-यास जेव्हा गरज असेल तेव्हा निरीक्षणाकरीता उपलब्ध करून देतील.

20) मला/आम्हाला जाणीव आहे की, जर मनपा आयुक्त किंवा त्यांनी नूमून दिलेल्या कोणत्याही सक्षम अधिका-यांस असे आढळले की, सदर कारंजे/धबधबा इ. हा उपद्रव किंवा जीवन, आरोग्य व मालमत्तेकरीता धोकादायक आहे तर परवानाधारक न्यायालयीन कारवाईस पात्र राहील किंवा सदर परवानगी रद्द करण्यात येईल

21) मला/आम्हाला जाणीव आहे की, सदर परवानगीचे निलंबन, रद्दबातल हे कोणत्याही कारणास्त्व मनपा आयुक्त किंवा त्यांचे सक्षम अधिका-यांना कुठल्याही प्रकारचा दावा किंवा मागणी मध्ये बाधीत करणार नाही. सदर परवानगी रद्द किंवा निलंबीत केल्यास परवानगीधारकाने भरलेल्या कोणत्याही शुल्काची परतफेड मागू शकणार नाही. व मनपाकडे कोणत्याही प्रकारचा बांधकाम खर्चाचा दावा करू शकणार नाही.

22) मला/आम्हाला जाणीव आहे की, मनपाने वेळोवेळी निर्धारीत केलेली अनामत रक्कम सदर कारंजे/धबधबा इ. च्या अटी व शर्तीच्या विश्वासपूर्वक पाळण्याकरीता भरण्यात येणार आहे. जर मनपा आयूक्त किंवा त्यांच्या सक्षम अधिकाऱ्यांच्या निर्देशनास आले कि परवानागीच्या अटी व नियम यांचे पालन योग्य प्रकारे होत नाही तर सदर अनामत रक्कम जप्त करून मनपा तिजोरीत जमा करण्यात येईल.

22 अ) मला/आम्हाला जाणीव आहे की, परवानगी समाप्त झाल्यानंतर किंवा रद्द केल्यानंतर, परवानाधारक सदर जागेवर असलेले बांधकाम 15 दिवसांचे आत काढून टाकेल अन्यथा मनपा किंवा त्यांचे सक्षम अधिकारी सदर बांधकाम कोणतीही सूचना न देता, मालकाच्या जबाबदारीवर काढून टाकतील किंवा तोडतील व सर्व खर्च परवानाधारककाकडून वसूल करतील.

23) मला/आम्हाला जाणीव आहे की, सदर पारवानगी ही मालक व जागेच्या दृष्टीकोनातून मनपाच्या सक्षम अधिका-याच्या परवानगी शिवाय अहस्तांतरणीय आहे.

24) मला/आम्हाला जाणीव आहे की, जर परवानाधारक सदर, कृत्रिम कारंजा / धबधबा बंद करू इच्छित असल्यास त्याबाबतची माहिती किटकनाशक अधिकारी यांचेकडे देतील.

25) मला/आम्हाला जाणीव आहे की, मनपास कृत्रिम कारंजा/धबधबा इ. परवानगी बाबतच्या कोणत्याही धोरणामध्ये केव्हाही, मनपा आयुक्त किंवा त्यांचे सक्षम अधिकारी यांना बदल, वाढ किंवा सुधारणा करण्याचे अधिकार आहेत. अशा वेळेस परवानाधारक सदर बदललेल्या शर्ती व अटी यांना बांधील असेल.

वरील सर्व अटी व शर्ती माझ्यावर / आमच्यावर माझ्या / आमच्या व्यवस्थापन आणि वचनदार यांचेवर बंधनकारक राहिल. मी/आम्ही मनपाच्या इतर खात्यातील नियमांचे पालन करू.

## <u>कूपनलिकेकरीता आवश्यक असणाऱ्या अटी व वचननामा/हमी.</u>

मी/आम्ही निम्नस्वाक्षरीकार पूढीलप्रमाणे असणारा वचननामा लिहून देत आहोत तसेच जाहीर करत आहोत.

1) कूपनलिकेचे तोंड हे डासप्रतिबंधक स्थितीत असेल व त्याच स्थितीत राखले जाईल.

2) "कूपनलिकेचे पाणी पिण्यायोग्य नाही" असा फलक दृष्टीक्षेपात येईल अशा ठिकाणी लावला जाईल.

3) कूपनलिकेमधून ज्या ज्या ठिकाणी पाणी वाहून नेले असेल त्या करीता स्वतंत्र जलवाहिनी टाकण्यात येईल व ती लाल रंगाने दर्शविली जाईल.

4) परवानगी दिलेल्या व्यतिरिक्त इतर कामासाठी कूपनलिकेचे पाणी वापरले जाणार नाही.

5) वाया गेलेले व सांडलेले पाणी साचू नये याकरीता तसेच त्याची विल्हेवाट लावण्याकरीता ते गटारांना जोडण्याची आवश्यक ती व्यवस्था करण्यात येईल आणि आजूबाजूला पाणी साठून राहणार नाही याचीही खबरदारी घेण्यात येईल.

6) महापालिकेतर्फे पूरविण्यात आलेले पिण्याचे पाणी आणि कूपनलिकेचे पाणी कोणत्याही स्थानी एकत्रित केले जाणार नाही तसेच त्यांची साठवणूक वेगवेगळ्या डास प्रतिबंधक टाक्यांमध्ये केली जाईल व ह्या टाक्या एकमेकांपासून पुर्णपणे वेगळ्या राहतील. तसेच टाक्यांपर्यंत पोहचण्यासाठी सोपा, सुरक्षित व कायमस्वरुपी मार्ग असेल.

7) कूपनलिकेतून काढले गेलेले पाणी नळजोडणी किंवा इतरत्र वापरले जाणार नाही, त्याचा साठा फक्त न पिण्यायोग्य पाणी साठविण्याच्या डास प्रतिबंधक टाकीमध्ये केला जाईल.

8) जलजोडणीचे काम अंतिमतः पूर्ण होईपर्यंत, खोदकाम सुरू नसताना कूपनलिकेच्या जमिनीखालील भागाचे तोंड योग्यरीतीने बंद करून ठेवले जाईल.

9) कूपनलिनकेचे काम पूर्ण झाल्यावर सगळे खड्डे बुजविण्यात येतील.

10) मालकीहक्काबाबत हस्तांतरण व बदल झाल्यास कूपनलिकेचे परिरक्षण करण्याची जबाबदारी नवीन मालकास बंधनकारक राहील. याबाबत किटकनाशक विभागास कळविणे आवश्यक असेल.

11) बृहन्मुंबई महानगरपालिका तिचे अधिकारी आणि नोकरवर्ग सर्व प्रकारच्या आर्थिक नुकसान, भरपाई, दंड व दावे आणि सर्व प्रकारच्या मागण्या ज्यामध्ये वर्कसमेन कॉपेनसेशन ऍक्ट 1923 नुसार केलेल्या दाव्यासंबंधी मागण्याही अंतर्भूत असतील यापासून कोणत्याही कारणाने अनूज्ञेय असलेल्या, कोणत्याही दुखापतीमुळे उद्भवलेल्या, कोणत्याही व्यक्तीपासून कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अनूज्ञात असलेल्या घटनेपासुन अबाधीत व सुरक्षित राहतील.

12) वरील नमूद केलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे अथवा अटीचे उल्लघंन झाल्यास तीन दिवसाची पूर्व सूचना देऊन सदर पाणी साठवून ठेवणा-या व्यवस्थेची परवानगी कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.

वरील सर्व बाबी माझ्यावर/आमच्यावर आमचे व्यवस्थापन आणि मुखत्यार यांना बंधनकारक राहील.मी/ आम्ही महानगरपालिकेच्या इतर खात्यांशी संबंधित बाबींची सुद्धा योग्य त्या कामाची पूर्तता करू.

## सिमेंट कॉंक्रिटच्या स्लॅबने आच्छादीत बंद विहीरीकरीता आवश्यक असणाऱ्या अटी व वचननामा/हमी.

## (एच.सी.सी.विहीर)

मी/आम्ही निम्नस्वाक्षरीकार पूढीलप्रमाणे असणारा वचननामा लिहून देत आहोत तसेच जाहीर करत आहोत.

1) मी/आम्ही सदर विहीर आर.सी.सी स्लॅबच्या सहाय्याने बंद करीत आहोत व सदर विहीर कायम डासप्रतिबंधक स्थितीत राहण्याच्या दृष्टीने त्यास डास प्रतिबंधक स्थिती आवश्यकतेकरीता प्रमाणित झाकण लावू.

2) "एच.सी.सी. विहीरीचे पाणी पिण्यायोग्य नाही" असा फलक दृष्टीक्षेपात येईल अशा ठिकाणी लावला जाईल.

3) विहीरीचे पाणी ज्या ज्या ठिकाणी वाहून नेले असेल त्या करीता स्वतंत्र जलवाहिनी टाकण्यात येईल व ती लाल रंगाने दर्शविली जाईल.

4) परवानगी दिलेल्या व्यतिरिक्त इतर कामासाठी विहीरीचे पाणी वापरले जाणार नाही.

5) वाया गेलेले व सांडलेले पाणी साचू नये याकरीता तसेच त्याची विल्हेवाट लावण्याकरीता ते गटारांना जोडण्याची आवश्यक ती व्यवस्था करण्यात येईल आणि आजूबाजूला पाणी साठून राहणार नाही याचीही खबरदारी घेण्यात येईल.

6) महापालिकेतर्फे पूरविण्यात आलेले पिण्याचे पाणी आणि विहीरीचे पाणी कोणत्याही स्थानी एकत्रित केले जाणार नाही तसेच त्यांची साठवणूक वेगवेगळ्या डास प्रतिबंधक टाक्यांमध्ये केली जाईल व ह्या टाक्या एकमेकांपासून पुर्णपणे वेगळ्या राहतील. तसेच टाक्यांपर्यंत पोहचण्यासाठी सोपा, सुरक्षित व कायमस्वरुपी मार्ग असेल.

7) विहीरीतून काढले गेलेले पाणी नळजोडणी किंवा इतरत्र वापरले जाणार नाही, त्याचा साठा फक्त न पिण्यायोग्य पाणी साठविण्याच्या डास प्रतिबंधक टाकीमध्ये केला जाईल.

8) काम पुर्ण झाल्यावर विहीरींच्या डास प्रतिबंधक स्थितीस धक्का न लावता मी/आम्ही आवश्यक ती उपसाधने पूर्णपणे काढून टाकू.

9) मालकीहक्काबाबत हस्तांतरण व बदल झाल्यास विहीरीचे परिरक्षण करण्याची जबाबदारी नवीन मालकास बंधनकारक राहील. याबाबत किटकनाशक विभागास कळविणे आवश्यक असेल.

10) बृहन्मुंबई महानगरपालिका तिचे अधिकारी आणि नोकरवर्ग सर्व प्रकारच्या आर्थिक नुकसान, भरपाई, दंड व दावे आणि सर्व प्रकारच्या मागण्या ज्यामध्ये वर्कसमेन कॉपेनसेशन ऍक्ट 1923 नुसार केलेल्या दाव्यासंबंधी मागण्याही अंतर्भूत असतील यापासून कोणत्याही कारणाने अनूज्ञेय असलेल्या, कोणत्याही दुखापतीमुळे उद्भवलेल्या, कोणत्याही व्यक्तीपासून कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अनूज्ञात असलेल्या घटनेपासुन अबाधीत व सुरक्षित राहतील.

11) वरील नमूद केलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे अथवा अटीचे उल्लघंन झाल्यास तीन दिवसाची पूर्व सूचना देऊन सदर पाणी साठवून ठेवणा-या व्यवस्थेची परवानगी कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.

वरील सर्व बाबी माझ्यावर/आमच्यावर आमचे व्यवस्थापन आणि मुखत्यार यांना बंधनकारक राहील.मी/ आम्ही महानगरपालिकेच्या इतर खात्यांशी संबंधित बाबींची सुद्धा योग्य त्या कामाची पूर्तता करू.

## कंकणाकृती विहीरीकरीता आवश्यक असणाऱ्या अटी व वचननामा/हमी.

## (रिंग वेल)

मी/आम्ही निम्नस्वाक्षरीकार पूढीलप्रमाणे असणारा वचननामा लिहून देत आहोत तसेच जाहीर करत आहोत.

1) मी/आम्ही सदर विहीर आर.सी.सी स्लॅबच्या सहाय्याने बंद करीत आहोत व सदर विहीर कायम डासप्रतिबंधक स्थितीत राहण्याच्यादृष्टीने त्यास डासप्रतिबंधासाठी महानगरपालिका मान्यताप्राप्त गोलाकार भिडाचे झाकण लावले जाईल.

2) कंकणाकृती विहीरीचे पाणी ज्या ज्या ठिकाणी वाहून नेले असेल त्या करीता स्वतंत्र जलवाहिनी टाकण्यात येईल व ती लाल रंगाने दर्शविली जाईल.

3) "कंकणाकृती विहीरीचे पाणी पिण्यायोग्य नाही" असा फलक दृष्टीक्षेपात येईल अशा ठिकाणी लावला जाईल.

4) महापालिकेतर्फे पूरविण्यात आलेले पिण्याचे पाणी आणि कंकणाकृती विहीरीचे पाणी कोणत्याही स्थानी एकत्रित केले जाणार नाही तसेच त्यांची साठवणूक वेगवेगळ्या डास प्रतिबंधक टाक्यांमध्ये केली जाईल व ह्या टाक्या एकमेकांपासून पुर्णपणे वेगळ्या राहतील. तसेच टाक्यांपर्यंत पोहचण्यासाठी सोपा, सुरक्षित व कायमस्वरुपी मार्ग असेल.

5) कंकणाकृती विहीरीतून काढले गेलेले पाणी नळजोडणी किंवा इतरत्र वापरले जाणार नाही, त्याचा साठा फक्त न पिण्यायोग्य पाणी साठविण्याच्या डास प्रतिबंधक टाकीमध्ये केला जाईल.

6) परवानगी दिलेल्या व्यतिरिक्त इतर कामासाठी कंकणाकृती विहीरीचे पाणी वापरले जाणार नाही.

7) वाया गेलेले व सांडलेले पाणी साचू नये याकरीता तसेच त्याची विल्हेवाट लावण्याकरीता ते गटारांना जोडण्याची आवश्यक ती व्यवस्था करण्यात येईल आणि आजूबाजूला पाणी साठून राहणार नाही याचीही खबरदारी घेण्यात येईल.

8) काम पुर्ण झाल्यावर कंकणाकृती विहीरीच्या डास प्रतिबंधक स्थितीस धक्का न लावता मी/आम्ही आवश्यक ती उपसाधने पूर्णपणे काढून टाकू.

9) बृहन्मुंबई महानगरपालिका तिचे अधिकारी आणि नोकरवर्ग सर्व प्रकारच्या आर्थिक नुकसान, भरपाई, दंड व दावे आणि सर्व प्रकारच्या मागण्या ज्यामध्ये वर्कसमेन कॉपेनसेशन ऍक्ट 1923 नुसार केलेल्या दाव्यासंबंधी मागण्याही अंतर्भूत असतील यापासून कोणत्याही कारणाने अनूज्ञेय असलेल्या, कोणत्याही दुखापतीमुळे उद्भवलेल्या, कोणत्याही व्यक्तीपासून कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अनूज्ञात असलेल्या घटनेपासुन अबाधीत व सुरक्षित राहतील.

10) तात्पुरती परवानगी मिळाल्यानंतर तीन महिन्याच्या कालावधीत कंकणाकृती विहीर खोदण्यात येईल व त्या अनुषंगाने सगळी कामे पूर्ण करण्यात येतील.

11) मालकीहक्काबाबत हस्तांतरण व बदल झाल्यास विहीरीचे परिरक्षण करण्याची जबाबदारी नवीन मालकास बंधनकारक राहील. याबाबत किटकनाशक विभागास कळविणे आवश्यक असेल.

वरील सर्व बाबी माझ्यावर/आमच्यावर आमचे व्यवस्थापन आणि मुखत्यार यांना बंधनकारक राहील. मी/ आम्ही महानगरपालिकेच्या इतर खात्यांशी संबंधित बाबींची सुद्धा योग्य त्या कामाची पूर्तता करू.

**औदयोगिक वापरासाठी विटांच्या टाकीची (मॅसोनरी टाकी) परवानगी मिळणेबाबत**

1) सदर विटांची टाकी ही पूर्णपणे रिकामी होण्यासाठी एक पाईप असावा आणि तो महानगरपालिका गटारास जोडणारा असावा.

2) किटकनाशक अधिकारी कार्यालयाने विहीत केलेल्या दिवशी आठवडयातून एकदा सदर टाकी पूर्णपणे कोरडी करावी व ती पुढील 24 तास तशीच ठेवावी.

3) डासांच्या अळया तयार होऊ नये याकरीता टाकीतील पाणी साठवून ठेवू नये.

4) टाकीची वारंवार पाहणी करण्याकरीता तसेच डासांच्या अळया कधीही न मिळण्याच्या दृष्टीने सदर खात्यातील कर्मचा-यांना पूर्ण सहकार्य देवू.

5) वरील एखादया शर्तीचा भंग झाल्यास अथवा महापालिका आयुक्त किंवा त्यांनी अधिकार बहाल केलेल्या एखादया अधिका-याने योग्य कारण दिल्यास सदर टाकीची परवानगी रद्द करण्यात येईल.

6) डासांच्या अळया टाकीमध्ये न मिळण्याच्या दृष्टीने करण्यात येणा-या कार्यवाहीची माहिती आपणास वेळोवेळी देण्यात येईल.

**कुलींग टॉवरला परवानगी देण्याबाबतच्या शर्ती**

1) कुलींग टॉवर जमिनीच्या पृष्ठभागापासुन 1.2 मीटरपेक्षा जास्त उंचीवर लावला/बांधला गेल्यास त्याचे कायमस्वरूपी निरीक्षण करण्यासाठी त्यास लोखंडी शिडी लावण्यात येईल (शिडीचा खालील भाग सिमेंट कॉक्रीटमध्ये घट्ट रोवून वरचा भाग हाताची योग्य पकड येण्याकरीता अर्धवर्तूळाकार पध्दतीने घट्ट केला जाईल)

2) आठवडयातून एकदा तळाचा भाग रिकामा केला जाईल आणि पुसून काढला जाईल.

3) कुलींग टॉवरच्या खालील पाणी साठविण्याच्या भागास कमीत कमी 2 मीटर उंचीवरून पाण्याच्या पातळीस व्यत्यय किंवा खळखळ होण्याच्या दृष्टीने पुरेशा प्रमाणात फवारा देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

सूचना : वरील शर्तीचे पालन न केल्यास कुलींग टॉवरची परवानगी रद्द करण्यात येईल आणि कायदेशीर कार्यवाही सुरू करण्यात येईल.

**<u>जॅकूझी व जलतरण तलावाच्या परवान्यासाठी अटी व शर्ती यांची पुर्तता करण्याबाबत</u>**

1) जॅकूझीसाठी वापरात असलेली पाण्याची टाकी पूर्णपणे रिकामी व्हावी यासाठी टाकीच्या तळाशी पाणी जाण्यासाठी व्यवस्था करण्यात येईल व ते बाहेर जाणारे पाणी महापालिकेच्या गटार व सांडपाणी यांचा निचरा करणा-या अधिकृत व्यवस्थेस जोडण्यात येईल व या सर्व कामांसाठी मनपा प्रमाणित जोडणी व वॉटरसील वापरण्यात येईल.

2) जॅकूझीसाठी वापरात असलेली पाण्याची टाकी आठवडयातून एकदा महापालिकेने निश्चित केलेल्या दिवशी पूर्ण रिकामी करून खरवडण्यात येईल. त्याच प्रमाणे पाण्याची टाकी 24 तास पूर्ण रिकामी व कोरडी ठेवण्यात येईल.

3) डासांची निर्मिती होऊ नये म्हणून जॅकूझीच्या टाकीतील पाणी सतत साठून राहणार नाही याची खबरदारी घेण्यात येईल.

4) मुंबई महापालिका कायद्यान्वये किटकनाशक अधिकारी यांस आवश्यक वाटेल तेव्हा जॅकूझीच्या टाकीची तपासणी तसेच फवारणी करण्याबाबत महापालिकेच्या अधिकृत अधिकारी किंवा कर्मचारी यांस विना अडथळा व तात्काळ प्रवेश देण्याची अट माझ्यावर बंधनकारक राहील.

5) जॅकूझीच्या टाकीत डास निर्मितीस प्रतिबंध व्हावा यासाठी किटकनाशक अधिकारी कार्यालयातून वेळोवेळी येणा-या सूचनांचे पालन मी करीन.

6) जॅकूझीच्या वापरासाठी कोणत्याही अतिरिक्त पाण्याची मागणी मी करणार नाही.

7) महापालिका आयुक्त अथवा त्यांचेमार्फत नेमलेल्या अधिकारी यांस कोणत्याही अटीचा भंग केला आहे असे आढळल्यास किंवा इतर सबळ कारणास्तव कोणतीही सबब न देता जॅकूझीचे ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल याची मला पूर्ण जाणीव आहे.

## <u>पुस्तिका – 14</u>

## <u>इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध असलेल्या माहितीचा तपशील</u>

**लागू नाही**

**पुस्तिका – 15**

नागरिकांना माहिती मिळण्यासाठी उपलब्ध असलेल्या सुविधांचा तपशील.

1) बृहन्मुंबई आरोग्यसेवा मार्गदर्शिका व आरोग्य रूपरेखा यासारखी छापील पुस्तिका.

2) प्रदर्शन

3) वृत्तपत्राव्दारे

4) माहिती, शिक्षण, संपर्क आणि सामुहिक प्रसारमाध्यमे उदा. जाहिरात फलक, पत्रके, घोषणा फलक,हस्तपत्रक, चलचित्रे, व्हीसीडी, दूरदर्शन प्रसार माध्यम, वृत्तपत्रप्रसार, इलेक्टॉनिक प्रसारमाध्यम, ऑल इंडिया रेडीओ, एफएमबॅंड, फोनव्दारे प्रचार, मेळावे, पथनाटय, रेल्वे, बसस्थानक, विमानतळावरची घोषणा पध्दती, दूरसंचार माध्यम इत्यादी.

5) वृत्तपत्राव्दारे सार्वजनिक अधिसुचना.

6) कायदेशीर सूचनापत्र.

**पुस्तिका – 16**

**अधिका-यांची माहिती**

| क्रं. | नाव | पदनाम | नियुक्ती दिनांक | कार्य कक्षा |
|---|---|---|---|---|
| १ | नितीन सुरेश ढोबे | कि. नि. अ. | ०६.०७.२०१५ | कि. नि. अ. एम/पूर्व |
| २ | रिक्त | पर्य. क. अवेक्षक | | कि. नि. अ. एम/पूर्व |
| ३ | विलास घुमे | लिपिक | ०१.१२.२०११ | कि. नि. अ. एम/पूर्व |
| ४ | विशाल विश्वनाथ मोकल | क. अवेक्षक | २५.०८.२००८ | कि. नि. अ. एम/पूर्व |
| ५ | रिक्त | क. अवेक्षक | | कि. नि. अ. एम/पूर्व |
| ६ | अरूणोदय ज्ञानू उबाळे | क. अवेक्षक | ०७.०६.२००६ | कि. नि. अ. एम/पूर्व |
| ७ | रिक्त | क. अवेक्षक | | कि. नि. अ. एम/पूर्व |
| ८ | कालियमूर्ती तंगवेल | क. अवेक्षक | ०६.१०.२००६ | कि. नि. अ. एम/पूर्व |
| ९ | रिक्त | क. अवेक्षक | | कि. नि. अ. एम/पूर्व |
| १० | रेखा महेश तांबे | क. अवेक्षक | २५.०३.२०१० | कि. नि. अ. एम/पूर्व |
| ११ | राठोड शेषराव रामभाऊ (निलंबित) | मू. क. अवेक्षक | २९.०९.२००८ | कि. नि. अ. एम/पूर्व |
| १२ | संजय बाबाजी कांबळे | धु.दु.नि. | ०१.११.१९९० | कि. नि. अ. एम/पूर्व |
| १३ | गौतम शंकर हिरे | रो.ना.दु. निरिक्षक | ०४.११.१९९३ | कि. नि. अ. एम/पूर्व |
| १४ | संदिप साहेबराव राजगुरू | व. क्षेत्र कार्यकर्ता | २४.१०.२००८ | कि. नि. अ. एम/पूर्व |
| १५ | सतिश छबु केदार | व. क्षेत्र कार्यकर्ता | ०१.११.२००८ | कि. नि. अ. एम/पूर्व |
| १६ | सिध्दार्थ कांबळे | व. क्षेत्र कार्यकर्ता | १७.०८.२००७ | कि. नि. अ. एम/पूर्व |
| १७ | किशोर रामभाऊ भेंडे | व. क्षेत्र कार्यकर्ता | ०१.०४.२०११ | कि. नि. अ. एम/पूर्व |

## पुस्तिका – 17
## इतर उपयोगी माहिती

| | |
|---|---|
| मध्यवर्ती भांडार गृह – | शहर विभागाकरीता एफ/द येथे, पश्चिम उपनगराकरीता पी/उ येथे व पुर्व उपनगराकरीता एम/प येथे विभाग कार्यालयात मध्यावर्ती भांडारगृह असून त्यात असलेल्या किटकनाशकाचा पुरवठा त्वरीत वेगवेगळया विभागात करण्यात येतो. |
| धुम्रफवारणी यंत्र दुरुस्ती कार्यशाळा- | ही कार्यशाळा जी/द येथे असून त्यात धुम्रफवारणी यंत्रांची व इंधनावर चालणा-या यंत्रांची देखभाल व दुरूस्ती केली जाते. |
| पंप दुरूस्ती केंद्र | मनुष्यबळाने चालविल्या जाणा-या फवारणी पंप व यंत्रांची दुरूस्ती करणारी कार्यशाळा ''एल'' विभागामध्ये आहे. |

खाजगी किटक नियंत्रण पुरवणा-या मान्यताप्राप्त संस्थांची यादी.

# BRIHANMUMBAI MAHANAGRPALIKA
## Public Health Department
## Insecticide Branch

Primary School Building, 2nd Floor, Gilder tank Ground, Dr. Dadasaheb Bhadkamkar Marg, Mumbai – 400007.

LIST OF MCGM APPROVED PRIVATE PEST CONTROL OPERATORS AS ON 13.06.2019

| Sr. No. | Name of Company & Proprieter | Address of Company |
|---|---|---|
| 1 | M/s. Pestermynate Enterprises<br>Pro.- Mr. Rajendra Jadhav<br>Tel. - 022 24712345<br>Mob. No. 9869228350 | 15, Vimawala House, Jijibhai Lane,<br>Opp. Center point , Lalbaug ,<br>Mumbai - 400012.<br>Email: pestermynate@gmail.com |
| 2 | M/s. Raj Associates<br>Pro. Mr. Sandeep Adsule<br>Mob.No. 9323890659 | Vaibhav Co-op, Hos. Society, 121/3997, Nehru Nagar, Kurla(E), Mumbai- 400024. |
| 3 | M/s. Rajshree Pest Control<br>Pro. – Mr. Manohar Chawan<br>Tel No.- 22626396/22622348<br>mob No.-9969871385 | Maharastra Bhavan , Office No. 47,<br>3rd Floor Bora Msjid Srteet ,<br>Off .Bora Bajar sreet Fort<br>Mumbai 400 001<br>Email-info@rajashreepestcontrol.com<br>Web:- www.rajashreepestcontrol.com |
| 4 | M/s. S P INDUSTRIES<br>Pro: Atul P. Bhat.<br>Mob No. - 9869781781 | 7- Akashdip, Govind Nagar, Sodawala Lane, Borivali (W) Mumbai 400 092.<br>Email : info@spindustries.com, ,<br>prvinjosh22@gmail.com<br>Web : www.spindusries.co |
| 5 | M/s. Bharat Pest Treatments<br>Pro. – Mr. Raj.R Shriyan<br>Tel No. – 26354277/26354293<br>Mob No. –<br>9820995553/9820995554 | 5/B Vishwageet Apartment,<br>4 Bunglows, Andheri (W)<br>Mumbai – 400 053.<br>Email – bharatpest@hotmail.com<br>Web : - www.bptpestsolutions.com |
| 6 | M/s. GD Pest Control Private Limited Director- Mr. Sanjay Parui<br>Mo.-9702444466/ 7738444466 | Shop No.2, Navyug Co-op, Hsg. Soc. Ltd.<br>Aarey Checknaka, Goregaon(E), Mumbai-63<br>Tel- 022- 29277333 |
| 7 | M/s. Amey Labour Co.op Society<br>Chairman- Mrs. Arti Satish Sawardekar | 103-6/6, Prem Nagar Colony, B.J. Kher Marg, Worli Naka, Mumbai-400 018.<br>Email- amaylabourcosltd@gmail.com |
| 8 | M/s. Tom Cat Pest Control<br>Pro. – Mr. Adil Asif Shaikh<br>Mob. 9223548623 | 10-A, Grace Plaza, S.V. Road, Jogeshwari (W)<br>Mumbai- 400 102.<br>Tel- 26796006,<br>Email – adtomcat29@yahoo.co.in |
| 9 | M/s. Hindustan Insecticide<br>Pro.- Mrs. Madhuri S. Zode<br>Tel – 022 26555492/26420566<br>Mob No. –<br>9821137624/9867743679 | 39/2011,Shivam Hsg. Society, Gandhi Nagar Bandra (E), Mumbai 400 051.<br>Email –hidustaninsecticide@hotmail.com<br>Web -www.hindustaninsecticide.com |
| 10 | M/s. Dapmans Pest Control and Allied Services<br>Pro. Aniket Daptardar<br>Tel No. - 0251- 2456562, 2431680 | B-41/2 Comercial Complex, Mahavir Nagar, Manpada Road, Dombivali(E), Mumbai-421201.<br>Email- dapmans@yahoo.com |

..2

| Sr. No. | Name of Company & Proprieter | Address of Company |
|---|---|---|
| 11 | M/s. Compact Facility Services Private Limited | Office No. 624, Bhim Nagar, Tanasa Pipeline Opp. 'D' Colony, Near Vishal Sales Agency, Vidyavihar (East), Mumbai-400 077<br>Tel No.- 022-65117217,<br>Email - compactfacility@gmail.com,<br>www.compactfacility.com |
| 12 | M/s. Aakansha Apang Seva Sahakari Sanstha Maryadit<br>Pro. Surendra M. Kharat<br>Mob. 9869778124, 9769252657 | 281/5, R.D. Lokhande Chawl, Dr. Ambedkar Chawk, Kurla (West), Pin- 400070. |
| 13 | M/s. Paragon Pesticides<br>164, Modi Street, 4th Floor, Fort, Mumbai | 164, Modi Street, 4th Floor, Fort, Mumbai- 400001,<br>Office Tel- 022-22611399, Mob-9820076116 / 9820663604 |
| 14 | M/s. Ultima Search<br>Pro. Yogesh W. Jadhav<br>Tel,.- 022-28751618, 28722711<br>Mob No. 9833036470 | 9-10, Shree Krishna Commercial Centre,<br>6, Udyog Nagar, Opp. Raheja Solitare,<br>Off. S.V. Road, Goregaon (W)<br>Mumbai- 400 062<br>Email: yogesh@ultimasearch.com |
| 15 | M/s. City Logic<br>Pro. Virender Pratap Singh<br>Mob. No. 9322729172, 8793306661 | B/103, Revati Apartment,<br>Opp. Sai Datta Temple, Sanyukt Nagar,<br>Achole Cross Road, Nalasopara (E),<br>Dist. Palghar, Pin- 401 209<br>Email. Citylogic.ss@gmail.com |

25/06/19

**Insecticide Officer**